# भाडे तत्वावर वाहने पुरवठा करण्याबाबत मुदतवाढ

मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा आणि इतर कार्यालयीन कामकाजासाठी दिनांक १ डिसेंबर, २०१५ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ या एक वर्षाच्या कालावधीकरिता तसेच संबंधित कंत्राटदाराची सेवा समाधानकारक आढळल्यास एक वर्षाच्या कालावधीनंतरही वाढ करण्यात येईल या तत्वावर डिझेल किंवा पेट्रोलवर चालणारी वाहने पुरेशा संख्येने (कमीतकमी २० ते २५ वाहने) (टाटा सुमो, बोलेरो, क्वॉलीस, इंडिगो कार्स, टेम्पो -(टाटा-४०७) इत्यादी विनावातानुकुलित तसेच इंडिगो, क्वॉलीस, बोलेरो, इन्होव्हा, होंडा सिटी, टोयोटा कोरोला इत्यादी वातानुकुलित) तसेच मासिक भाडे तत्वावर वाहने पुरविण्याची क्षमता असलेल्या अनुभवी व सक्षम वाहतूक कंत्राटदाराकडून विहित नमुन्यात सिलबंद निविदा टु बीड पध्दतीने (Technical and Commercial) निविदा अर्ज स्विकारण्याच्या कालावधीस दि. २८ सप्टेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

निविदा अर्ज (अटी व शर्तिंसह) रोखपाल, वित्त व लेखा विभाग, तळमजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०० ०३२ येथे रु. ५०/- (ना परतावा) भरुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते २.३० वाजेपर्यंत दिनांक २४/०८/२०१५ ते २४/०९/२०१५ पर्यंत उपलब्ध होतील.

विहीत नमुन्यात भरलेल्या सिलबंद निविदा आवश्यक ती कागदपत्रे तसेच इसा-या रक्कमेपोटी वित्त व लेखा अधिकारी यांच्या नावे असलेला बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) इत्यादिंसहित दि. २८/०९/२०१५ पर्यंत सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत सहायक कुलसचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, कक्ष क्र.१२१, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स्वीकारण्यात येतील. तसेच प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडण्याची दिनांक, वेळ व ठिकाण संबंधितांना पत्राव्दारे, टेलिफोनव्दारे किंवा ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. अधिक माहितीसाठी सहायक कुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, कक्ष क्र.१२१, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०० ०३२ यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासन राखून ठेवित आहे.

18/9/15

मुंबई - ४०० ०३२
दि. १८ सप्टेंबर, २०१५

डॉ. एम.ए.खान
कुलसचिव